**नियमित फौजदारी खटला क्रमांक -३९/२०२४**
**महा. शासन वि. प्रदिप सकट**
**निशाणी क्रमांक- १५/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - १ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | तेजल योगेंद्र राणे |
| वय | - | २६ वर्षे |
| व्यवसाय | - | घरकाम |
| पत्ता | - | सोळांकूर, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** मी आरोपींना ओळखते. आजरोजी न्यायालयात आरोपी क्र.१ हजर दिसत आहे. आरोपी हे माझे पतीचे मित्र होय. दि.१९/११/२०२३ रोजी काहीही घडलेले नाही. मला आता माझा जबाब दाखविणेत आला.त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझे माहितीचा नाही. त्या सहीस **निशाणी P16/PW1** देण्यात येते.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/११/२०२३ रोजी दुपारी ३ वाजणेचे सुमारास आरोपी माझे पती यास पैशांच्या देवाण-घेवाणीवरून गैबी येथे घेऊन गेले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतींना तिथेच सोडून दुपारी ३:२० चे सुमारास माझे घरी परत आले. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळीस आरोपी हे मला आमचे पैसे परत द्या असे

म्हणू लागले. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळी मी आरोपींना आमचेकडे एवढे पैसे नाहीत, पैसे आल्यावर देतो असे म्हणाले. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळी आरोपी क्र.१ याने तुझ्याकडे पैसे नसतील तर तु चल असे म्हणून उजवा हात धरून माझे अंगावरील टॉप फाडला व माझे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे वागले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी राधानगरी पोलीस ठाणेत आरोपींविरूध्द तक्रार दिली. माझे जबाबातील अधो.भाग अ का नमुद आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझेत व आरोपीत न्यायालया बाहेर आपआपसात तडजोड झाली आहे व माझी आरोपींविरूध्द काही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. एस. हुपरीकर वकील यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : १६/०७/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी.

---